22

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सातवा मजला,
नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक- 4 सितम्बर SEP 2002

## -: कार्यालयीन आदेश क्रमांक २५ :-

विषय:- जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायत लेखा परिक्षण नियोजनाबाबत.
संदर्भ:- कोकण भवन, नवी मुंबई येथील राज्यस्तरीय बैठकीचे कार्यवृत्तांत क्र.स्थानि१८/न/सभा/मुलेप/८११, दिनांक १७/०७/२००२.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षणाबाबत संदर्भाधिन बैठकीमध्ये चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयाचे अनुषंगाने खालील आदेश देण्यात येत आहेत.

१) जिल्हा परिषद, लेखा परिक्षणासाठी पूरेसे कर्मचारी उपलब्ध असलेने या लेखा परीक्षणासाठी ग्रामपंचायत विभागाकडील लेखा परिक्षकांची सेवा अगदी आवश्यक असल्यासच वापरण्यात याव्यात.

२) ग्रामपंचायत विभागाकडील लेखा परिक्षकांना ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षणाचा कार्यक्रम आखून द्यावा व जास्तीत जास्त घटक निकाली निघतील असे पहावे. कार्यक्रम मंजुर करतांना प्रलंबित घटकांना प्राधान्याने स्थान देण्यांत यावे.

३) विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी वरील आदेशाप्रमाणे तसेच कार्यालयीन आदेश क्रमांक २०, दिनांक १४/०७/२००२ प्रमाणे आपले विभागात काम होत आहे याची खात्री करावी. तसेच वेळोवेळी लेखा परिक्षणाच्या कामाचा आढावा घ्यावा.

(signature) ६/९/०२

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत:-
१ उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, विभाग (सर्व).
२ उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा (सर्व).
३ उपमुख्य लेखा परीक्षक (पंरास), स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४ अधिक्षक (अहवाल/पंरास)
५ सहाय्यक अधिक्षक (अहवाल)/ अेअे-२
६ अभिलेखापाल
७ फाईल- L-I-A-OO.

नराडे २८८२००२.